सकाळ अॅग्रोवन

# बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ट्रायकोडर्माचा वापर

डॉ. सुजॉय साहा, ऋषिकेश भोसले

**द्राक्ष उत्पादन तंत्र**

सध्या राज्यातील सर्वच द्राक्ष पट्ट्यात पाऊस सुरू आहे. या काळात बागेत रोगांचा प्रादुर्भाव होण्यास अनुकूल हवामान स्थिती असते. पावसाळी वातावरणामुळे बागेतील जमिनीमध्ये ओलावा असतो. त्यामुळे वेलींच्या मुळांभोवती सुप्तावस्थेत असलेले रोगांचे बीजाणू सक्रिय होऊन ते द्राक्ष वेलीस प्रभावित करतात. रोग व्यवस्थापनाकरिता रासायनिक निविष्ठांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे जमिनीचा पोत खालावत जातो. यावेळी रासायनिक निविष्ठांऐवजी जैविक बुरशीनाशकांचा वापर फायदेशीर ठरतो.

रोगनियंत्रणासाठी मांजरी येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राने द्राक्षासाठी जैविक बुरशीनाशक मांजरी ट्रायकोशक्ती (भुकटी) आणि मांजरी वाइनगार्ड (द्रवरूप) विकसित केले आहे. ट्रायकोडर्मा ही रोगकारक बुरशींच्या धाग्यांना विळखा घालून त्यातील पोषक द्रव्य शोषून घेते. परिणामी, रोगकारक बुरशीमध्ये कार्बन, नायट्रोजन आणि जीवनसत्त्वांची कमतरता निर्माण होऊन त्यांची वाढ खुंटते. ट्रायकोडर्मा हा नैसर्गिक घटक असून, पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. खरड छाटणी झाल्यानंतर ट्रायकोडर्माचा वापर केल्यास बागा एकसारख्या फुटण्यास मदत होते. तसेच ड्रेंचिंग केल्यास मुळीच्या सभोवताली असलेल्या रोगकारक बीजाणूला नष्ट करते. त्यामुळे वेलीमध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढून वेली सक्षम होतात. याशिवाय ट्रायकोडर्मा बुरशीची वेलीवर वाढ होऊन ती रोगकारक बुरशीची वाढ होण्यापासून अटकाव करते.

### वापर

- मांजरी ट्रायकोशक्ती (भुकटी) १० ग्रॅम प्रति एकर प्रमाणे ठिबकद्वारे द्यावे.


मांजरी ट्रायकोशक्ती


मांजरी वाइनगार्ड

- मांजरी वाइनगार्ड (द्रवरूप) २ ते ५ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी किंवा ठिबकद्वारे २ मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे आळवणी करावी.

### घ्यावयाची काळजी

- ट्रायकोडर्मा व रासायनिक बुरशीनाशके यांचा एकत्रित वापर (टँक मिक्स) करू नये.
- ट्रायकोडर्मा सूर्यप्रकाशापासून दूर थंड जागेत साठवावे.

- डॉ. सुजॉय साहा, ९४५०३९४०५३
- ऋषिकेश भोसले, ९६५७१४५५३३
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि.पुणे)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट अॅग्रेस्कोप्राप्त आहेत. • फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. • खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. • बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. • लेबल क्लेम वाचावेत. • पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. • रसायनांचा गट तपासावा. • पीएचआय, एमआरएल तपासावेत. • पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

## छोट्या जाहिराती
व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड: सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-
विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

**खते / औषधे**

**खते / औषधे विक्री**

खास परदेशातून आयात केलेली विद्राव्य खते,चिलेटेड न्युट्रीयंट्स, ह्युमिक, अॅमिनो, सिवीड, सिलीका,फुलविक पावडर व लिक्वीड,पीजीआर फॉर्म्युलेशन व त्यासाठी सर्व प्रकारचे केमिकल, रॉ मटेरीयल पॅकींग मटेरीयल, सॉईल कंडिशनर, सेंद्रीय खत,निंबोळी पावडर व दाणेदार कंपन्यांना रीपॅकींगसाठी सरकारी परवाना व लॅब अॅग्रीमेंटसह बल्कमध्ये उपलब्ध.अल्फा बायो प्रॉडक्ट्स नाशिक. ७२४९६९२३८४, ९५५२२४२१७६

स्टॅनमॅक्स मुंबई आणि पुणे इंपोर्टर, मॅन्युफॅक्चरर, बल्क सप्लायर्स, इडिटीए/ अॅमिनो चिलेटेड, मायक्रो न्युट्रीएंटस, सोल्युबल फर्टिलायझर्स, बायो पेस्टीसाईड्स, पीजीआर स्पेशल फॉर्म्युलेशन. संपर्क: 9819103243, 9067677475,ऑफिस7020838459

जोशी अॅग्रो, मुंबई. इंपोर्टर-सप्लायर, एनपीके फर्टिलायझर, मायक्रोन्युट्रीयंट, अमिनो, ह्युमिक, सिविड, फुल्विक, फॉस्फॉरिक, बोरॉन, सल्फर बायो- पीजीआर

आषाढीवारी प्रदर्शन! विक्री! दिव्य औषधी वनस्पतींची देशातील सर्वात मोठी रोपवाटिका. काळी हळदी सह अति दुर्मिळ, लागवड योग्य अति मौल्यवान, आयुर्वेद, वास्तुशास्त्र, वनस्पतीतंत्र, ज्योतिष, धार्मिक इ. शास्त्रीय सर्व प्रकारची रोपे उपलब्ध. 7709902754.

**अवजारे / यंत्रसामग्री**

**अवजारे / यंत्र विक्री**

गुराळातील मशिनरी १) कैलास ५ नं. घाणा २) ४० टनी वजन काटा ३) गुळ पावडर मशीन ४) पॅकिंग मशीन कायली दोन साईट मटेरियल विकणे आहे. फोन: ८६९८१९९३९३.

**जमीनविषयक**

**ओसाड/ खारवट जमीन सुधारणा**

साधारण/ क्षारपड/ चौपन जमीन प्रकल्प स्वरूपात संपूर्ण जबाबदारीने सुपिक (सेंद्रीय कर्ब, पाण्याचा निचरा, भुसभुशीतपणा, लागवडी योग्य) केली जाईल. कालावधी- 100 दिवस/ 3 महिने. संपर्क : Soil Fertility

**शेतीविषयक व्यवसाय**

**इतर व्यवसाय**

आपण शेतीबरोबरच शाश्वत व्यवसाय करून कायमस्वरूपी लाखो रूपये कमवू इच्छीता व तेही कोणतेही भांडवल न गुंतवता व जास्त वेळ काम न करता तर मग अल्फा बायो हि संधी आपणास देत आहे, अधिक माहितीसाठी या संदर्भात आपल्या जिल्ह्यात आयोजीत केलेल्या मोफत सेमीनारसाठी आजच आपली नावनोंदणी करा.संपर्क. ८०१०२४९२४९

**शेतीविषयक अन्य विषय**

**फलोत्पादन/ फळप्रक्रिया**

शेती, फळबाग, भाजीपाला मेंटेनन्स मजुरांसह. फळझाडांची नवीन लागवड- जोपासना, खत नियोजन, मार्केटिंग, छाटणी करतो www.agrifrutfarming.com / 9850601641.